# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.३०/०६/२०१८
## दि.२९/०६/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ७६७/१८,भादविक ३२४,३०७,३०९,५०४ |
| **फिर्यादी** | दिलीप कांबळे,वय ४२ वर्षे,रा.काळेपडळ,हडपसर, पुणे |
| **आरोपी** | मिलींद शहाजी कसबे,वय ३० वर्षे,रा.खंडोबाचा माळ,फुरसुंगी,ता.हवेली,जि.पुणे,मुळगाव दुधगांव, ता.जि.उस्मानाबाद(जखमी) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २८/६/१८ रोजी १६/०० वा.चे सुमारास स.नं.३५ प्रगतीनगर काळेपडळ,हडपसर,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी यांचे जावई मिलींद कसबे याने त्याची पत्नी नंदीनीला मुलासह मुळगांवी चल असे सांगितले असता तिने तसेच फिर्यादीने गावी जाण्यास नकार दिला त्याकारणावरुन त्याने मनात राग धरुन, पत्नी-१)नंदीनी मिलींद कसबे,वय २२ वर्षे,रा.खंडोबाचा माळ,फुरसुंगी,ता.हवेली,जि.पुणे, मुलगी-२)गौरी मिलींद कसबे वय ४ वर्षे,रा.सदर यांच्या गळ्यावरती जीवे मारण्याच्या उद्देशाने धारधार चाकुने वार करुन गंभीररित्या जखमी केले. त्यावेळी सासरे-३)दिलीप देवराम कांबळे,वय ४२ वर्षे,रा.प्रगतीनगर, काळेपडळ हडपसर,पुणे, फिर्यादी यांचा भाऊ-४)मनोहर देवराम कांबळे,रा.सदर, फिर्यादी यांचा पुतण्या-५)सागर मनोहर कांबळे,वय १९ वर्षे,रा.सदर अडविण्याकरीता गेले असता त्यांनाही धारधार चाकुने वार करुन गंभीर जखमी करुन व स्वतःवरतीही त्याच चाकुने गळ्यावरती वार करुन, स्वतःचा जीव संपविण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एच.बी.खोपडे ९९२३१०७३२३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दिघी पो स्टे १७२/१८,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | एक पुरुष, वय ६२ वर्षे,रा.दिघी पुणे, |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०६/२०१८ रोजी २०/३० वा.चे सुमारास साई मंदिर अंतर्गत दुर्गा माता मंदिर, वडमुखवाडी, च-होली बुाा,ता.हवेली,जि.पुणे |
| **तपशिल** | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी, साई मंदिर अंतर्गत, एक दुर्गा मातेची पितळी मुर्ती ४ हजार रु.किंमतीची हीस फिर्यादी हे नैवेद्य दाखवण्यासाठी गेले असता,ती मंदिरात दिसुन आली नाही. ती कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांचे संमत्तीशिवाय, लबाडीचे इराद्याने चोरुन नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्ही.एस.पगारे ९८२३९९१३७७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ४३७/१८,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | विनोद मोटवाणी,वय ५२ वर्षे,रा.पिंपरी,पुणे |
| **आरोपी** | जीवत प्रेमचंद नागराणी, रा.ए ४२ तिसरा मजला रेंटेड क्वार्टर चिराग फर्नीचर जवळ,पिंपरी पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | डिसेंबर २०१५ ते फेब्रुवारी २०१६ दरम्यान पिंपरी, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील नमुद इसम-जीवत नागराणी यांनी डिसेंबर २०१५ मध्ये त्यांचे आर्थिक अडचणींसाठी फिर्यादी यांचेकडुन १० लाख रु. घेतले, त्यानंतर जानेवारी २०१६ मध्ये जीवत नागराणी याने फिर्यादी यांना सांगितले की आपण मिनरल वॉटर व सॉफ्ट ड्रिंकचा व्यवसाय करु त्यास २५ लाख रु.लागणार आहेत असे सांगितले त्यास जानेवारी २०१६ फेब्रुवारी २०१६ मध्ये रोख स्वरुपात व तसेच वेगवेगळे चेक स्वरुपात एकुण १९ लाख |

| | |
|---|---|
| | ५० हजार रु.दिले आहे. ती रक्कम व व्यवसायातील नफा व फिर्यादी यांचे रकमेची दुस-या व्यवसायात गुंतवणुक करुन, त्यामध्ये नफा कमावला, त्याची रक्कम अशी एकुण ४६ लाख रु. न देता फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.उप.निरी. ढुबल ९८८१२३४७२३ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३३३/१८,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | अंकिता शिरकांडे,वय ३१ वर्षे,रा.आंबेगाव पठार पुणे |
| **आरोपी** | अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०६/२०१८ रोजी ११/३५ वा.चे सुमारास स्टेट बँक ऑफ इंडिया, भारती विद्यापीठ मेन गेट शेजारी, कात्रज, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी यातील फिर्यादी हे स्टेट बँक ऑफ इंडिया भारती विद्यापीठ मेन गेट शेजारी कात्रज,पुणे येथे पैसे भरणेकामी गेल्या होत्या त्यावेळी बँकेमध्ये एक अनोळखी इसमाने तो बँकेतील कर्मचारी असल्याचे सांगुण, फिर्यादी यांचेकडील रु. ९७ हजार ५००/- रोख रक्कम घेवुन, कॅश मॅनेजर यांचेकडे न भरता फिर्यादी यांची फसवणुक करुन घेवुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. सी.एम.सुर्यवंशी ९४०५६६७४२३ |

## <u>दि.३०/०६/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

| | |
|---|---|
| **१** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४००/१८,भादविक ३९२,३४१,३४ |
| **फिर्यादी** | बाजीराव शिंदे, वय ३४ वर्षे,रा.नानापेठ,पुणे |
| **आरोपी** | १)करण बंडु सोनवणे, वय २० वर्षे,रा.सर्व्हे नं.१२, लक्ष्मीनगर, येरवडा,पुणे २)जावेद मन्सुर शेख,वय २२ वर्षे,रा.सदर व त्यांचे दोन साथीदार (अ.क्र. १ व २ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०६/२०१८ रोजी रात्रौ ००/४५ वा.चे सुमारास मातोश्री गेट समोर लक्ष्मीनगर,येरवडा, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचा मित्र अब्दुल खान,रा.सदर असे त्यांचे मोटार सयकलवरुन कामावरुन त्यांचे घरी जात असताना, यातील नमुद इसमांनी त्यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांची गाडी आडवुन,त्यांना खाली उतरवुन, फिर्यादी व त्यांचे मित्राचे खिशातील दोन मोबाईल, रोख रक्कम १ हजार ७००/- रुपये व एक घडयाळ असा एकुण १३ हजार ७००/- रुपये किंमतीचा माल जबरदस्तीने मारहाण करुन, चोरुन घेवुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.गवारी ९९२३५०९८९२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**